






डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२/२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

# गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या (भाग–५)

## इसापनीतीच्या गोष्टी



प्रकाशकः
डोअर स्टेप स्कूल
११०, आनंद पार्क,
औंध, पुणे ४११००७
☎ २५८९८७६२
२५४३२१६५
ई-मेल : dsspune@vsnl.net

डोअर स्टेप स्कूल
५२/५३ जे.एस. म्युनसिपल स्कूल
नाना चौक, ग्रॅन्ट रोड
मुंबई ४००००७
☎ २३८२६३४३/२३८५९२०३

© डोअर स्टेप स्कूल

**किंमत रु**

तिसरी आवृत्ती :
मार्च २००४
कव्हर :
बी. सुहासिनी
आतील चित्रे :
कॉम्प्युटर ग्रॅफिकस आणि
संपदा भानप, शमा जोशी व
बी. सुहासिनी

# देव आणि उंट



एक होता उंट. सारखा काही ना काही कुरकुर करायचा. उंटाला वाटायचे मला देवाने काहीच चांगले दिले नाही. बाकी सगळेजण देवाचे

लाडके आणि मी का नावडता? काय माझी पाठ? टेकडीसारखी. काय ते पाय? लांबच लांब. खायला काटेरी झुडपे आणि पाणी देखील कधीतरी मिळायचे. मिळेल तसे पिऊन साठवून ठेवायचे. आणि सतत ते ओझे घेऊन चालायचे. असे कोणालाही करावे लागत नाही. मग मलाच का? शिवाय मला मोठाले दात नाहीत की शिंगे नाहीत. कोणी मला मारायला आले तर मी कसा माझे रक्षण करणार?

मग उंट एक दिवस देवाकडे गेला. "देवा, तू बाकीची जनावरे किती चांगली केली आहेस. कोणाला



नखे तर कोणाला सुळे तर कोणाला दात दिले आहेस आणि कोणाला शिंगे दिली आहेस. यामुळे ती जनावरे आपआपले रक्षण करतात. मला तेवढे काहीच दिले नाहीस. मग मी आपले रक्षण कसे करू? ते काही नाही मला निदान शिंगे तरी देच."

देवाने सांगितले की " बाबा रे मी तुला चांगले मोठे शरीर दिले आहे. तुला पाहूनच दुसरी जनावरे भिऊन पळून जातील. शिवाय तू खूप जोराने पळतोस. तुझा पाठलाग करणे सोपे नाही. आहे ते चांगले आहे असे समजून समाधानात रहा. नसता

विचार करू नकोस. शिंगांचा तुला काय उपयोग? उलट चालताना, पळताना झाडात अडकतील." देवाने उंटाची फार समजूत घातली. पण उंट काही ऐकेना. आपला हेका सोडीना. कुरकुर काही थांबेना. उंटाची भुणभुण ऐकून देवाचे डोके उठले. देवाला उंटाचा राग आला. उंटाला आता शिक्षाच केली पाहीजे. असा विचार करून देवाने उंटाचे कान कापून लहान केले. शिंगे तर मिळाली नाहीतच पण असलेले कान लहान झाले.

❑❑❑



# दोघे सोबती

रामा व हरी या नावाचे दोघे सोबती रानातून वाट चालत होते. रामा अंगाने बराच बोजाड होता: पण हरी अगदीच सडपातळ व चपळ होता. झाडीतून एखादे जनावर येईल आणि आपणाला खाईल अशी रामाला सारखी भीती वाटत होती. हरी फार बढाईखोर होता. तो रामाला फुशारकीने उगीच धीर देत होता.

तो एकसारखा रामाला हसत होता आणि सांगत होता की," रामा, तू फार भितोस बुवा ! अरे, एखादा वाघ आला तरी मी आहे ना ! मी ताबडतोब तुझे रक्षण करीन." असे बोलत ते चालले आहेत तोच झाडीतून एक मोठी आरोळी ऐकू आली. आरोळी ऐकताच दोघेही फार घाबरले. हरी सडपातळ आणि चपळ होता: रामाला तसाच टाकून तो भरभर एका झाडावर चढून गेला.



बिचारा रामा होता जाड. तो हरी सारखा झाडावर कसा चढणार? मग तो तसाच डोळे मिटून जमिनीवर पडला. जसा काही तो मेलेलाच आहे! रामाला माहित होते की, सिंहाला मेलेली शिकार आवडत नाही. लौकरच झाडातून एक भला मोठा सिंह बाहेर आला. रामाला पाहताच जवळ आला आणि रामाचे नाक-कान हुंगू लागला. तो भयंकर सिंह इतका जवळ आला





तरी रामाने अगदी हालचाल केली नाही व नाकातून वाराही बाहेर येऊ दिला नाही. हरी झाडावरून हे सारे पाहत होता. अखेर, रामा मेलेला आहे असे सिंहाला वाटून तो निघून गेला. लागलीच हरी उतरला व दोघेही फिरून वाट चालू लागले. आपण रामाला फसविले याची हरीला लाज वाटतच होतीः पण ते सारे

हशावारी घालवावयासाठी हरीने रामाला विचारले,"काय रे,सिंहाने एवढे तुला कानात काय सांगितले?" रामा बोलला,"हरीसारखा लबाड सोबती कामाचा नाही. बढाईखोर माणसावर भरवसा ठेवू नये, असे सिंहाने मला सांगितले आहे." हे ऐकून हरी फारच खजील झाला.

❑❑❑



# लबाड गाढव

एका माणसाजवळ एक गाढव होते. तो माणूस वाणी होता. तो परगावी सामान विकत घेई आणि गाढवावर लादून आपले घरी आणी. एकदा तो वाणी गाढवावर मिठाची गोणी लादून ती घरी आणीत होता. वाटेत एक लहानशी नदी होती. नदीतून जाताना गाढवाचा पाय घसरला आणि ते नदीत पडले, तोच पाणी मिठाचे गोणीत शिरले व बरेच मीठ विरघळून गेले. बरेच मीठ विरघळले गेल्यामुळे गाढवाचे ओझे अगदी हलके झाले. पुढे काही दिवसांनी वाणी मिठाची दुसरी खेप घेऊन आला. नदी जवळ येताच गाढवाला मागील खेपेची आठवण झाली. लागलीच ते जाणून बूजून पाय चूकवून नदीत पडले. परत मीठ विरघळून ओझे हलके झाले.

दोन-चार वेळा गाढवाने तसेच केले. शेवटी गाढवाची ही लबाडी मालकाला कळून चुकली. गाढवाला धडा शिकवावा असा विचार करून मालकाने गोणीत कापूस भरला. आणि निघाला गाढवाला घेऊन. परत नदी जवळ येताच गाढव खाली पडले. पण या वेळेस कापूस विरघळून भार कमी झाला नाही; उलट पाणी कापसात शिरून ओझे बरेच जड झाले. मोठे ओझे पाठीवर पडून ते लबाड गाढव भाराखाली चेंगरून गेले.



❑❑❑



# ससा व कासव

एक कासव हळूहळू घरी चालले होते. कासवाला भराभर चालता येत नाही. तिकडून आला एक ससा. साशाचे चालणे तुरूतुरू. आणि पळणे तर काही विचारूच नका. एकदम जलद! सशाला आपण भरभर चालतो याचा फार अभिमान वाटे. कासवाला हळू चालताना पाहून कासवाची गंमत करावी असा विचार करून सशाने कासवाला हटकले. “काय रे ही तुझी चाल. अशाने तू घरी कधी पोहोचणार?’

कासवाला थोडा रागच आला. याला भरभर चालता येते यामुळे याची इतकी ऐट. हा भरभर चालतो. पण वाटेत काही दिसले की वळला तिकडे. कुठलेही काम नीट मनापासून करील तर शपथ! याची एकदा जिरवलीच पाहीजे. असा विचार करून कासवाने सशाला विचारले ‘लावतोस पैज? ती समोर टेकडी

दिसते आहे तिथे कोण आधी पोहोचते ते पाहू.' हे ऐकून तर तर सशाला फारच गंमत वाटली. हसत हसतच सशाने कासवाबरोबर पैज घेतली. आणि पैज सुरू झाली.

सशाने सुरवातीलाच थोडावेळ अगदी जोरात पळून घेतले. आणि कासवाला फारच मागे टाकले. कासव आपले सावकाश चालले हाते. सशाने मागे वळून पाहिले. पण कासव काही कुठे दिसले नाही.

मग ससा रमत गमत चालायला लागला. वाटेत काय दिसेल ते बघत बघत निघाला. वाटेत एके ठिकाणी छान कोवळे गवत पाहून ससा एकदम खुश झाला. वा! अजून कासव दिसतही नाही इतके दूर आहे. तोवर आपण थोडे गवत खायला काय हरकत आहे? कासव दिसले की एकदम धूम ठोकून पुढे जाऊ.

असा विचार करून ससोबा लागले गवत खायला. खाता खाता पोट भरले. आता जरावेळ



झाडाखाली बसून कासवाची वाट बघू. अशा विचाराने ससा झाडाखाली सावलीत बसला. पोट भरलेले. थंडगार सावली. सशाला लागली झोप!

इकडे कासव आपले चाललेच आहे. समोर दिसते आहे टेकडी तिथे पोहोचायचे हा एकच विचार. इकडे पाहीले नाही. तिकडे पाहीले नाही. रमला नाही की गमला नाही. हळूहळू चालत का होईना पण कासव टेकडीवर पोहाचले. ससोबा अजून झोपलेलेच!

काही वेळाने सशाला आली जाग.सशाने हळूहळू जांभई देत देत इकडे तिकडे बघितले. पण मागे कुठेही कासव दिसेना. बघता बघता सशाची नजर सहज टेकडीकडे गेली. अरे हे काय? कासवासारखे कोण दिसते आहे तिथे? असे वाटून ससा एकदम घाबरला. पळत जाऊन टेकडीवर पोहाचला. बघतो तर काय? कासव आपले आरामात बसलेले इकडची 'तिकडची

गंमत बघत! सशाला पाहून कासवाने विचारले 'काय ससोबा, हरलात ना पैज?' फार ऐट दाखवत होतात'.

पण हे ऐकायला ससोबा मुळी तिथे होतेच कुठे. ते तर कधीच धूम ठोकून पसार झाले होते!



❑❑❑



# वेडे सांबर



एक होते सांबर. पाणी पिता पिता नदीत बघायचा सांबराला नादच लागला होता. नदीत बघता बघता ते मनाशी बोलायचे.'अहाहा, ही माझी शिंगे किती छानदार आहेत. अशी चांगली शिंगे देवाने कोणालाही दिली नाहीत. पण देवाने मला असे बारीक आणि कसेतरीच दिसणारे पाय कशाला दिले कुणास ठाऊक. यापेक्षा मला पायच दिले नसते तरी चालले असते'.

असते'.

एक दिवस सांबर असाच विचार करीत नदीत उभे असताना तिकडून काही शिकारी आले. पावलांचा आवाज ऐकताच सांबर जीव घेऊन पळू लागले. पाठोपाठ शिकारी येतच होते.

पळता पळता सांबराची शिंगे एका काटेरी झुडपात अडकली. मग सांबराने बरीच खटपट करून शिंगे कशीबशी सोडवून घेतली. आणि बघता बघता ते झाडीत दिसेनासे झाले.

शिकारी निघून गेले. सांबराला पळून पळून खूप तहान लागली होती. ते नेहेमीसारखे नदीवर जाऊन पाणी पिऊ लागले. पण पायांकडे बघून सांबराला आता राग आला नाही. पाय सुंदर नसतील पण तेच खरे उपयागी आहेत हे सांबराला समजले. आपली चूक कळाली आणि देवाने केले ते बरोबरच होते हेही समजले.

❑❑❑



# आमची पुस्तके

अ-गट
- पुस्तकमाला भाग-१ (मुळाक्षरे)
- पुस्तकमाला भाग-२ (आकार)
- पुस्तकमाला भाग-३ (ईकार)
- पुस्तकमाला भाग-४ (उकार)
- पुस्तकमाला भाग-५ (एकार)
- पुस्तकमाला भाग-६ (ऐकार)
- पुस्तकमाला भाग-७ (ओकार)
- पुस्तकमाला भाग-८ (औकार)

ब-गट
- मुळाक्षरांचे पुस्तक
- कान्याचे पुस्तक
- वेलांटीचे पुस्तक
- उकारांचे पुस्तक
- एका मात्रेचे पुस्तक
- दोन मात्रांचे पुस्तक
- ओकाराचे पुस्तक
- औकाराचे पुस्तक

- जोडाक्षरांचा सराव - २ भाग
- कोडीच कोडी मजाच मजा - २ भाग
- लहान शब्दकोश
- गोष्टी इकडच्या तिकडच्या गमती जमतीच्या
- हस्तपुस्तिका
- बहिस्थ परिक्षेसंबंधीची माहिती
- वयाचा दाखला कसा काढावा ?
- शालेय वाचनालय चालवताना